स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 28–12–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 2. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 3. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 363:— अ) प्रभाग क्र. 67 ब, मानेवाडा दहनघाट येथे पार्कींग व्यवस्था करण्याकरिता मानेवाडा नाल्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे व नाला भिंत बांधण्याचे कामास्तव रु. 1,54,88,917/– रक्कमेच्या फेर प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A43501271705 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा तसेच,

ब) सदर कामाकरिता मे. मुसळे डेव्हलपर्स यांना जुन्याच करारनाम्याच्या अधिन प्राकलनिय दरापेक्षा 24.21 टक्के कमी दरानुसार रु. 1,17,39,050/– कार्यादेश करणे व मे. विघ्नहर्ता कन्सलटिंग इंजिनिअर यांची पी.एम. सी. म्हणून नेमणूक करणे तसेच 2015–16 चे अर्थसंकल्पातून पद क्र. A43501271705 मधून तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 364</u>:— प्रभाग क्र. 8 अ मधील तिरुपती बँक ते काळबांडे नर्सिंग होम ते रिंग रोड पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 34,99,287/– (अक्षरी चौतीस लक्ष नव्यानऊ हजार दोनशे सत्यांशी रुपये फक्त) रक्कमेच्या प्राकलनास जुने पद 680 नवीन पद क्र. A42001374612 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 365</u>:— नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोन कार्यालयांमध्ये देनंदिन कामाकरीता लागणाऱ्या संगणक कंझ्युमेबल्स व साहित्याच्या खरेदीसाठी दरकरार करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोन कार्यालयामध्ये दैनंदिन कामाकरीता लागणारे संगणकाचे कंझ्युमेबल्स व साहित्य खरेदीसाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी नविन दर करार करण्याकरीता ई–निविदा बोलविण्सास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 366</u>:— प्रभाग क्र. 32–ब, स्मॉल फॅक्टरी एरिया येथे हरियाना भवन ते हिंदुस्थान विद्यालय, पगारीया लॉन मागील रस्ता व डी.एन.स्टील ते तेजस स्टील पर्यंत रस्त्याचा विकास करण्यास्तव रु. 46,82,716/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A22001330802 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 367</u>:— प्रभाग क्र. ५२ अ व ब मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.एम.दयारमानी यांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा 3.75 प्रतिशत अधिक दराची रु. 31,11,666/– (अक्षरी एकतीस लक्ष अकरा हजार सहाशे सहासठ फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 368</u>:— प्रभाग क्र. २५ येथील धरमपेठ गाडगा व गिरीपेठ, गोरेपेठ येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.एम.दयारमानी यांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा 3.75 प्रतिशत अधिक दराची रु. 31,12,191/– (अक्षरी एकतीस लक्ष बारा हजार

एकशे एक्यांनऊ फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 369</u>:— स्वामी विवेकानंद स्मारक, अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईंट जवळील विविध स्थापत्य कामे करण्याच्या कामास्तव रु. 34,41,000/— (अक्षरी चौतीस लक्ष एक्केचाळीस हजार फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 370</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या मा. पदाधिकारी, अधिकारी तसेच आवश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामाकरीता एकमेकांशी सुसवांद साधण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे मोवाईल सिमकार्ड सेवा पुरविण्यात आलेली आहे. हि सेवा मंजूर निम्नतम निविदा दराने मे. भारती एअरटेल लिमिटेड यांचेकडून घेण्यात आली असून त्याची मुदत दिनांक 14.01.2016 रोजी संपुष्टात येत आहे. मोबाईल सिमकार्ड सेवेचे दर निश्चित करण्यासाठी वार्षीक खर्च रू. 40,00,000/— (रूपये चाळीस लक्ष फक्त) ची ई—निविदा बोलविण्यास तसेच मोबाईल सेवा खंडीत होवु नये याकरीता निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मे. भारती एअरटेल लिमीटेड ची सेवा सुरू ठवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा काढण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते, निविदा प्रक्रीया पुर्ण होई पर्यंत 1 महिन्याची मुदत वाढ देण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते, दिलेल्या मुदत वाढीत निविदा प्रक्रिया प्रशासनाने पूर्ण करावी असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

खर्चाचे प्रावधान पद क्र. 10 (A28400120505) "दुरध्वनी खर्च" या पदामध्ये करण्यात आले आहे.

<u>ठराव क्रमांक 371</u>:— प्रभाग क्र. 46 — ब, न्यु नंदनवन येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 35,60,275/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे तसेच पद क्र. A22001330802 अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 372</u>:— प्रभाग क्र. 36—अ, मधील भांडेवाडी आणि प्रजापती नगर येथील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्यास्तव रु. 31,25,000/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधून रु. 31,25,000/— तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

<u>विषय क्रमांक 373</u>:— प्रभाग क्र. 53 अ येथील संजयनगर आणि काचीमेट व प्रभाग क्र. 53—ब येथील रामनगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर. एम. गोपलानी यांची मुळ

प्राकलनीय दरांपेक्षा 3.95 प्रतिशत अधिक दराची रू. 31,16,906/- (अक्षरी एकतीस लक्ष सोळा हजार नऊशे सहा फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 374:— हद्दवाढ झालेल्या क्षेत्रात पायाभूत सोई सुविधा निर्मिती करीता नागपूर महानगरपालिके द्वारा सादर करण्यात आलेला हुडकेश्वर (बु.) या भागातील विविध ठिकाणी खडीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 14.79 कोटी रकमेचा प्रस्तावास महानगरपालिकेची 20 टक्के हिस्साची रक्कम रु. 2.97 कोटी भरण्यास सहमती असल्याचा ठराव मंजूर करणे या अटीच्या अधिन राहून शासन हिस्स्याच्या रु. 11.82 कोटी पैकी प्रथम हप्ता रक्कम रु. 5.91 कोटी मंजूर करण्यास मान्यता प्राप्त आहे. करीता हुडकेश्वर या भागातील विविध ठिकाणी खडीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव म.न.पा.च्या (20 टक्के) हिस्स्यापोटी रु. 2.97 कोटी रकमेचा सहभाग देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते तसेच धोरणात्मक निर्णय असल्यामूळे मनपा सभागृहाच्या मंजूरी करीता, सभागृहात पाठविण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते. स्थायी समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदरहु प्रस्तावास सहमती असल्याचे शासनास प्रशासनाद्वारे कळवावे असेही निर्देश हि स्थायी समिती देते असा एकमताने निर्णय घेतला.

ठराव क्रमांक 375:— प्रभाग क्र. 55 व 56 वर्धारोड देव नगर चौक ते सिमेंट रोड पर्यंत डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पि.एम.ए. कंस्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.90 टक्के अधिक दराची निविदा रूपये 98,07,363/- (रूपये अठयानऊ लक्ष सात हजार तिनशे त्रेसष्ठ रूपये फक्त) स्विकृत करण्याचा तसेच हे काम पद क्रमांक 370 (A22001330801) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 376:— प्रभाग क्र. 8 ब मधील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत रु.29,99,893/- (अक्षरी एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार आठशे त्र्यांनऊ फक्त) प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 377:— नागपूर शहर विकास आराखडया नुसार, उत्तर अंबाझरी रोडवरील मातृसेवा संघ ते अमरावती रोडवरील म्युअर मेमोरीअल हॉस्पीटल पर्यंत 12 मीटर रूंदीचा रस्ता, पुल, संरक्षण भिंतीच्या बांधकामाकरीता ( EP 70) विकासीत करण्यास्तव प्राप्त मे. आर.के.संचेती यांची 4. 99 टक्के अधिकची रू. 4,42,35,520/- (अक्षरी चार करोड बेचाळीस लक्ष पस्तीस हजार पाचशे वीस फक्त) ची निम्नतम निविदासह रू. 6,58,653/-

प्रकल्प व्यवस्थापका वरील खर्च तसेच विद्युती करण्याकरीता रू. 16,00,200/— खर्चाचा समावेश असलेला रू. 4,64,94,373/— चा प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 378</u>:— हनुमान नगर झोन क्र. 3, प्रभाग क्र. 62 ब अंतर्गत विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रू. 27,08,500/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 379</u>:— अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईंट येथील स्वामी विवेकानंद स्मारका जवळील अरुंद पुलाचे रुंदीकरण करण्याच्या कामास्तव प्रापत निविदापैकी मे. द्वारका कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 15. 1 प्रतिशत कमी दराची रु. 22,86,291/— (अक्षरी बावीस लक्ष छयांशी हजार दोनशे ऐक्यांनऊ फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

.

<u>ठराव क्रमांक 380</u>:— प्रभाग क्र. 18 अ व ब गांधीबाग तांडापेठ मुसलमानपुरा व बांग्लादेश, नाईकवाडी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे कामास्तव प्राप्त 17 निविदापैकी मे. आर.बी.यादव यांची प्राकलनीय दरापेक्षा 0.56 प्रतिशत ने कमी दरांची निविदा वाटाघाटी करुन 1.50 प्रतिशत ने कमी दराची रु. 29,53,648/— (एकोणतीस लक्ष त्रेपन हजार सहाशे अठ्ठेचाळीस) रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री दिपक पटेल :— यह दिसंबर महीना चल रहा है,नगरसेवकों कों जो फिक्स प्रायारीटी मिली है जिसमें रोड वगैरे की काफी फाईलें बनी है उसकी क्या स्थिती है हमें उसकी जानकारी चाहिये ।

सभापती स्थायी समिती :— दिपक पटेल हे आपले सिनीयर अनुभवी सदस्य आहे त्यांच्या लक्षात आले 8—9 महिने पुर्ण झाले आहे. 3/4 हेडाची फिक्स प्रायारीटीची फाईल झालेली नाही यापुर्वी असे होते नव्हते पहले अन्य प्रायारीटीची नस्ती होत होती नंतर फिक्स प्रायारीटीची नस्ती परंतू आपण हे पहिल्यांनाच सुरु केले होते नागपूर महानगरपालिकेची स्थिती सर्वाना माहित आहे. त्यानुसार पहीले फिक्स प्रायारीटीची नस्ती करण्याचे काम आपण केलेले होते. त्यांची काय स्थिती आहे ती समजली नाही झोन मधलीही नस्ती आतापर्यनत झालेली नाही. ही खुप गंभीर बाब आहे. जेव्हा की कुणाला कोणते काम बघायचे आहे हे निश्चीत असूनही असे का करण्यात येत आहे या संबंधात काय परिस्थितीती आहे ते सांगण्यात यावे. प्रत्येक झोन वाईज याची माहिती देण्यात यावी. ही फार गंभीर बाब आहे. आतापर्यन्त आपले निश्चित झाल्याप्रमाणे आपण प्रशासनाच्या वरती जावून काम करणार नाही आणी प्रशासनानेही आमच्या वरती जावून काम करु नये तरीही असे काम होत आहे. कारण

शहराच्या विकासाच्या कामात आपण अडचन निर्माण करीत आहात असे मानुन आयुक्तांचे आपणास असे निर्देश असावे अशी शंका आम्हास येण्यास वाव मिळेल. असे असेल तर आम्ही शासनाकडे ही बाब मांडणार आहे.यापुर्वी आयुक्त साहेब सिध्दीकी साहेब यांच्याशी यांसबंधात चर्चा झाली होती. प्रथम फिक्स प्रायारीटीची नस्ती ते करणार होते. या संबंधात कॅफो यांचेसहही चर्चा करण्यात आली आहे. सव्वा दोनशे कोटीचे काम करावयाचे आहे. फिक्स प्रायारीटीची नस्तीची स्थिती काय आहे केव्हा टेंडर झोणार आहे केव्हा झाले आहे प्रशासकीय मंजूरी, प्रोव्हीजन केव्हा मिळाले या बाबत संपूर्ण माहिती आम्हाला मिळावयास हवी झोन वाईज ती सांगण्यात यावी. झोन क्र 1 पासून सुरवात करण्यात यावी.

श्री गुप्ता :— या बाबत संपूर्ण माहीती मागीतली आहे आपणास माहिती उद्या देतो.

श्री वारके :— थोड्या वेळात देतो.

श्री नेरल :— पूर्ण विवरणासह माहिती लवकरच देतो.

अध्यक्ष :— नस्तीत केव्हा प्रावधान मिळाले कॅफोकडे केव्हा गेली, प्रशासकीय मंजूरी, टेंडर केव्हा झाले व इतर आवश्यक सर्व माहिती उद्या पर्यन्त देण्यात यावी.

श्री दिपक पटेल :—2 टेंडर 15 परसेंट बिलो है निगोशीएशन के लिये है उसमें भी देरी हो रही है । 34 परसेंट बिलों एक नस्ती है उसमें भी देरी हो रही है । यह कौनसी नई परंपरा चालू हो रही है ।

श्री किशोर डोरले :— ज्या इक्झीकेटीव्ह लोकांच प्रमोशन झाले आहे त्यांना बसण्याकरीता व्यवस्था करण्यात आलेली नाही काय? श्री भुतकर यांचे बसण्याचे स्थान कूठे आहे ज्या कार्य.अभियंता ची जबाबदारी झोनची आहे त्यांची झोन मध्ये बसण्याची व्यवस्था का करण्यात आलेली नाही. नियमात तशी व्यवस्था करावयास हवी त्यांना तिथे बसने आवश्यक आहे.

श्री दिपक पटेल :— मा. अध्यक्ष महोदय फुले मार्केट का सायकल स्टन्ड टेंडर 21 हजार रुपये का हुआ था बादमें मार्केट कळमना शिप्ट हो गया ठेकेदार उस वजह से उतना पैसा देने में असमर्थ था तो उसने 6 हजार रुपये महिने देने की पेशकश की कॉर्यालय नें भी उसका स्टडी किया तो उनका अनुमान साडे सात हजार महिना आया । हमने बारबार यह विषय स्थायी समिती में उठाया है उसपर मा. सभापती स्थायी समितीने निर्णय दिया है । स्पष्ठ निर्देश होने के बावजूद भी अभी तक विभाग व्दारे उचित कार्यवाही नही की गई है ।

मार्केट सुपरिटेंडेट :— या संबंधात नस्ती 23.12.2015 ला अप्पर आयुक्तांकडे पाठविण्यात आली आहे

श्री दिपक पटेल :– इसमें आयुक्त से चर्चा हो कर निगोशिएशन के लिये 6 महिना पुर्व वह फाईल आई थी इसमें डिपार्टमेंट में दिरंगाई नही करते हुये निर्णय लेना चाहिये महानगरपालिका की आर्थिक स्थिती को ध्यान में रखते हूये विभाग ने काम करना चाहिये ।

सभापती स्थायी समिती :– जो ठेकेदार ईमानदारी ने काम करण्यास तयार आहे अश्या प्रकरणा मध्ये त्वरीत निर्णय घ्यावयास हवे हे प्रकरण पुढच्या सभेत ठेवण्यात यावे.

श्री गजभीये :– फुले मार्केट मध्ये पैसा वसूल करने चाले आहे काय?

मार्केट सुपरिटेडेंटः– तो पैसा रोजच्या हिशोबाने पाठवित आहे

श्री गजभीये :– पुढच्या सभेत अश्या प्रकारचे प्रकरण कूठे आहे व ह्या प्रकरणा संबंधात पूर्ण माहिती देण्यास सांगाण्यात यावी.

<u>ठराव क्रमांक 381</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर